IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 2, September 2025
Impact Factor: 7.67

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांची सद्यस्थितीतील प्रासंगिकता

*डॉ. प्रेरणा दिलीप दीक्षित*
*समाजशास्त्र विभाग, सहायक प्राध्यापक*
*वैद्यनाथ महाविद्यालय, परळी वैजनाथ*
preranadixit9@gmail.com

गोषवारा -

आधुनिक काळातील महान संत म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांकडे पाहिले जाते. ज्यांनी मध्ययुगीन काळातील संतांच्या मानवतावादी विचारांचा वारसा आधुनिक काळामध्ये पुढे नेण्याचे कार्य केले. त्यांच्या जीवन कार्याची ओळख तसेच समाजाला दिलेले अनमोल विचार, मार्गदर्शन आणि त्यांच्या विचारांची सद्यस्थितीतील प्रासंगिकता अभ्यासण्याच्या उद्देशाने हे संशोधन कार्य करण्यात येणार आहे. संशोधनाला वस्तूनिष्ठता प्राप्त व्हावी म्हणून दुय्यम स्त्रोतांचा तथ्य संकलनासाठी वापर करण्यात येणार आहे. महाराजांचे विचार म्हणजे आजच्या काळाची गरज होय. आपल्या संपूर्ण आयुष्यात त्यांनी मानवतेचा सल्ला सबंध जगाला दिला. भजनातून शिक्षणाचे महत्त्व, आई-वडिलांची सेवा, माणसा-माणसात एकोपा, सहकार्य, ग्रामोन्नती, विश्वबंधुत्त्व अशी शिकवण देऊन वैचारिक क्रांती त्यांनी जनमानसात घडवली. कित्येक परिषदा, संम्मेलन, चळवळी त्यांनी आपल्या विचारांनी, भजनांनी गाजवल्या. इंग्रजांविरुद्ध केलेल्या कार्यासाठी त्यांचे कौतुक प.ज.नेहरू, महात्मा गांधी, डॉ.राजेंद्र प्रसाद अशा महान पुरुषांनी केले. आज समाज शिक्षित होत आहे, पण कुठे तरी माणूसच हरवत जात आहे. जाती व धर्मात विभागला जात आहे. आजही अंधश्रद्धा, अस्पृश्यता, स्त्री-पुरुष असमानता, बालविवाह अशा प्रकारांना संपूर्णपणे आळा बसू शकला नाही. ही परिस्थिती बदलवायची असेल, तर अशा या महान व्यक्तिमत्त्वाचे विचार देशाने आचरणात

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 2, September 2025
Impact Factor: 7.67

**आणणे आवश्यक आहे. याच सुविचाराने संशोधिकेने या शोधनिबंधाच्या माध्यमातून तुकडोजींचे विचार समाजापर्यंत आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.**

मुख्य शब्द - **संत, जीवन-परिचय, विचार, सद्यस्थिती, प्रासंगिकता**

---

**प्रस्तावना –**

*'सत्' या संस्कृत शब्दापासून 'संत' या बहूवचन शब्दाची निर्मिती झाली. ज्याचा अर्थ सत्य आणि चांगुलपणाने युक्त असलेला असा होतो. अशाच व्यक्तिंची म्हणजेच संतांची भूमी म्हणून महाराष्ट्राला ओळखले जाते. महाराष्ट्राला संतांची दीर्घ परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, मुक्ताई इत्यादी., असे महान संत मध्ययुगीन कालखंडामध्ये होऊन गेले. संतांची परंपरा त्यांचा वारसा आधुनिक कालखंडात संत गाडगेबाबा, संत तुकडोजी, भगवान बाबा महाराज यांनी पुढे नेला. या संतांनी महाराष्ट्राला व मराठी भाषेला वाड्मयाचा मोठा वारसा दिल्याचे लक्षात येते.*

आधुनिक कालखंडातील तुकडोजी महाराजांनी आपले विचार, अभंग, किर्तन, भाषण, काव्य आणि आपल्या कार्यातून सामाजिक परिवर्तन घडवून आणले. यांचे कार्य अद्वितीय आहे. जिथे तुकडोजींचे खंजिरी भजन तिथे लोकांची फार गर्दी असायची. भजनांचा प्रभाव जनतेवर फार होता. हे आपणास जनमानसात झालेल्या परिवर्तनावरून लक्षात येते. तुकडोजींचे काव्य हे प्रवासातील घाई गडबडीत निर्माण झालेले असले तरीही फार प्रभावी आहे. मधुकर वाकोडे लिहितात,"तुकडोजींनी आपल्या भजनात असंख्य विषयांना हात घातला त्यांच्या भजनांमधून देश निष्ठा ,विवेक निष्ठा, समाज निष्ठा, कृषी निष्ठा व निष्ठा सुगंधी दुपार सारखी तन मनात दरवळते. पण त्याबरोबरच धर्म चिकित्सा, मानवतावाद, स्त्रियांची उन्नती, व्यसनमुक्ती, कर्जमुक्ती, कल्याण, उद्यमशीलता, आदर्श ग्राम यासारख्या जीवनाच्या सर्वांगीण पैलुंचा विचार करून त्यावर

तुकडोजी उत्कृष्ट भाषण करायचे. त्यांचे चिंतन काळजाला स्पर्श करणारे व चैत्राप्रमाणे नवी पालवी फोडणारे, असे होते." वाकोडेंच्या या वक्तव्यावरून तुकडोजींच्या भजनाचे आणि विचारांचे महत्त्व लक्षात येते. खंजिरी या वाद्याच्या साहाय्याने अस्पृश्यता, जातीभेद, अंधश्रद्धा इत्यादींवर त्यांनी कठोर प्रहार केला. त्यांचे सामाजिक कार्य, समाजाविषयी आस्था, प्रेम यामुळे लोक त्यांच्याकडे आकर्षिल्या जायचे. त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना ज्ञानयोगी, प्रेमयोगी, कर्मयोगी म्हणून ओळखले जाते.

आई-वडिलांची सेवा, दिन दुबळ्यांना मदत तसेच जात, धर्म, यात भेदभाव होऊ नये. एकमेकांच्या सहकार्याने राहावे. चांगल्या कार्यानेच माणूस मोठा होत असतो. जीवन सुंदर करणारे, असे विचार त्यांनी लोकांना दिले. आज समाजात आई बापाची सेवा करण्याऐवजी त्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवला जातो. या अशा एकविसाव्या शतकात परिस्थिती काही वेगळीच दिसून येते. संतांच्या अभंगांचा त्यांच्या विचारांचा या पिढीला विसर पडत चाललेला आहे. सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकलेल्या आजच्या समाजाला परत एकदा तुकडोजींच्या विचारांची, त्यांच्या कार्याची आणि त्यांच्या अभंगाची जाणीव करून देण्याची गरज आहे. त्यासाठी त्यांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचवणे, प्रत्यक्षात आचरणात उतरवणे महत्वाची ठरते. जेणेकरून समाजात आज ज्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यावर आळा बसण्यास मदत होईल. या दृष्टीने सदरील संशोधन महत्वाचे ठरते.

प्रस्तुत शोध निबंधात मानवतावादी संत तुकडोजी यांचा जीवन परिचय, त्यांचे विचार तसेच विचारांची आज २१व्या शतकात आवश्यकता काय? हे या शोध निबंधाच्या माध्यमातून खालील प्रमाणे अधोरेखित करण्यात आलेले आहे.

**संशोधनाचा उद्देश –**

१. तुकडोजी महाराजांच्या जीवन परिचयाचा थोडक्यात आढावा घेणे.

२. महाराजांच्या सामाजिक विचारांचा अभ्यास करणे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 5, Issue 2, September 2025 Impact Factor: 7.67

३. तुकडोजींच्या विचारांची सद्यस्थितीतील प्रासंगिकता अभ्यासणे.

**संशोधन पद्धती** –

प्रस्तुत संशोधन विषय शास्त्रीय पद्धतीने हाताळण्यासाठी संशोधिकेने पूर्णतः दुय्यम माहिती स्त्रोतांचा वापर केलेला आहे. त्यात प्रामुख्याने संशोधन उद्देशाला अनुसरून ग्रंथ, पुस्तके, शासकीय अहवाल, वेबसाइट्स, वर्तमानपत्रे, मासिक, नियतकालिका, विश्वकोश अशा वस्तुनिष्ठ स्त्रोतांचा वापर केलेला आहे. संकलित तथ्यांची अचूक पडताळणी करूनच संशोधन कार्य पूर्ण केले आहे. तसेच वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केलेला आहे.

**संशोधनात वापरण्यात आलेल्या प्रमुख संकल्पना-**

**संत** या संकल्पनेचा मुख्यतः अर्थ साधू, संन्यासी, त्यागी पुरुष असा होतो. तुकडोजी महाराज सत्य आचरण करणारे संत महात्मे होते. त्यामुळेच त्यांना राष्ट्रसंत ही पदवी बहाल करण्यात आली. संशोधिकेने याच आदरयुक्त दृष्टीकोनातून येथे संत शब्द प्रयोग केलेला आहे. या महान व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची त्यांच्या बालपणापासून ते मृत्यू पर्यंतची ओळख थोडक्यात सांगण्याच्या उद्देशाने **जीवन-परिचय** संकल्पना वापरली आहे. महाराजांनी जनतेला भजनातून जीवनविषयक, समाज आणि राष्ट्रविषयक सकारात्मक, असे अमुल्य जे मार्गदर्शन केले. जी शिकवण दिली त्यासाठी **विचार** ही संकल्पना सदरील सशोधनात वापरली आहे. जवळपास सर्वच क्षेत्रात आजची विचलित परिस्थिती लक्षात घेण्याच्या हेतूने **सद्यस्थिती** हा शब्द प्रयोग केलेला आहे. आजच्या अयोग्य परिस्थितीला तुकडोजी महाराजांचे विचार कशा प्रकारे आणि किती उपयुक्त आहेत. त्याचा सद्यस्थितीला कसा संबंध जुळतो. हे सांगण्याच्या दृष्टीने **प्रासंगिकता** ही संकल्पना वापरण्यात आलेली आहे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 2, September 2025
Impact Factor: 7.67

**संशोधनाची मर्यादा –**

प्रत्येक संशोधनाला काही मर्यादा असतात. त्याप्रमाणे या संशोधनालाही काही मर्यादा आहेत. या संशोधनात फक्त एकमेव राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जीवन परिचय अभ्यासला आहे. येथे त्यांचे आई-वडिल किंवा गुरु यांच्यावर अभ्यास केलेला नाही. तसेच यात महाराजांच्या अभंगाचा समावेश नाही. त्यांचे विचार आणि सद्यस्थितीतील प्रासंगिकता यावर भर देण्यात आलेला आहे. या संशोधनाची मर्यादा इथपर्यंतच आहे.

**जीवन परिचय –**

समाज परिवर्तनवादी युगपुरुष, देशसेवेचे ध्येय भजन, कीर्तनाच्या माध्यमातून ठेवण्याचा प्रयत्न करणारे आणि आधुनिक संतांमध्ये आगळे वेगळे व्यक्तिमत्व म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होय. यांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी भारतातील महाराष्ट्र प्रांतातील, विदर्भ भूमितील, अमरावती जिल्ह्यातील 'यावली' या गावी झाला. बंडोजी उर्फ नामदेव गणेशपंत इंगळे व भक्तीमती मंजुळादेवी बंडोजी इंगळे या धार्मिक, आध्यात्मिक दाम्पत्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला. पुढे त्यांचे माणिकदेव, असे नामकरण करण्यात आले. त्यांचे नाव माणिकदेव जरी असले, तरी परमहंस आडकोजी महाराजांनी कौतुकाने त्यांच्यासाठी तुकड्या तुकड्या असा घोष केला होता. त्यावेळेस पासूनच तुकड्या याच नावाचा सर्वत्र प्रसार झाला. भक्तीरसानेयुक्त अशा पवित्र कुळात, गरिबीचे चटके खात त्यांचे बालपण गेले. त्यांना शाळेतील शिक्षणापेक्षा कविता, कीर्तन, भजन यातच रस असायचा. पित्याच्या तामसी स्वभावामुळे माणिकदेवाला आईबरोबर गृहत्याग करावा लागला. त्यानंतर ते आडकोजी महाराजांच्या सहवासात अनेक संतांचे अभंग गात. यातुनच पुढे काव्य लेखनास सुरवात झाली. एके दिवशी आडकोजी महाराजांजवळ बसून ते तुकोबारायांचे 'तुका म्हणे, गुण चंदनाचे अंगी, असे गात असताना आडकोजी महाराज म्हणाले, "तुका म्हणे,तू का म्हणे? 'तुकड्या म्हणे' म्हण!" ही सद्गुरूंची आज्ञा मानून तुकड्यादास स्वकाव्य करू लागले. यातूनच पुढे असंख्य अभंग, भजने त्यांनी रचली. लहानपणापासूनच त्यांनी ग्रामोन्नतीची कामे सुरु केली होती. समाजातील अंधश्रद्धा, अस्पृश्यता, अज्ञान, स्त्री-पुरुष असमानता दूर करण्यास प्रयत्न सुरु केले होते. "याच काळात १५ नोव्हेंबर १९२१ रोजी आडकोजी महाराजांचे समाधिस्त झाले. तुकडोजींना गुरुविरह सहन

Copyright to IJARSCT

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429 Volume 5, Issue 2, September 2025 Impact Factor: 7.67

होत नव्हता, याच अवस्थेत ते यावलीस परत गेले. शिवणकाम करून माता-पित्याचा सांभाळ केला. त्यानंतर तपश्चर्येसाठी रामटेकच्या अरण्याची वाट धरली. रामटेक अरण्यात तपश्चर्या करताना एका अज्ञात तेज पुंज महायोग्याने बाल तुकड्यास योग साधना शिकवली. दिवसरात्र समाज निरीक्षनासह घोर अरण्यातील पशुपक्षांच्या सान्निध्यात एकांत ध्यानसाधना व लोकांतात धर्मनिरुपण अशी दिनचर्या या बालयोग्याची होती. यातून बाल तुकडोजी सर्वत्र परिचीत झाले.स्वामी सीतारामदास महाराज यांना तर तुकडोजींची विलक्षण तेज पुंज मुद्रा पाहून साक्षात प्रभू रामचंद्रच अशी प्रचिती झाली होती.”

कमी वय साधा वेश तरी एक वेगळेच अध्यात्म तेज जवळ असूनही ते इतर मुलांसोबत खेळत असे. खंजिरी, ढोल, शंख आदि वाजवण्याचे कौशल्य त्यांच्यात होते. भल्याभल्या ज्ञानी लोकांसमवेत ते ज्ञानचर्चा करत. अनेक ग्रंथाची रचना त्यांनी केली. आपल्या रचनेतून, लिखाणातून, भाषण, काव्यातून समाज परिवर्तन केले. देशभक्तांची संघटना तयार केली. खंजिरी भजन या साधनाचा उपयोग समाज प्रबोधनासाठी ते करत. त्यांचे भजन ऐकण्यासाठी ५० हजार ते १ लाखापर्यंत जमाव असूनही त्यात शांतता असायची. एकदा महाराजांच्या भजनात लीन गांधीजींना देखिल मौनाचे भान राहिले नव्हते. स्व:प्राणाची पर्वा न करता जुलमी इंग्रजी सत्तेविरुद्ध केलेले त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. राष्ट्रालाच देव मानणारा अलिकडच्या काळात असाही एक संत असू शकतो. हे पंडित नेहरुंना महाराजांच्या भजन आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वावरून कळून आले. अशा व्यक्तिमत्त्वामुळे समाजात त्यांना फार आदराचे स्थान होते.

१८५७ पासूनच ब्रिटीश विरोधी चळवळ सुरु होती. पुढे १९३० साली राष्ट्रीय भजनाने ब्रिटीश विरोधी विद्रोहाची लाट निर्माण झाली होती. यातूनच भजन बंदीचे फर्मान जाहिर केले होते. छोडो भारत चळवळीत त्यांनी १९४१ मध्ये सहभाग घेतला होता. १९४७ मध्ये गुरुकुंज आश्रमात आदर्श गौरक्षणाची निर्मिती केली. पुढे १९५५ साली जपानच्या पंचम विश्वधर्म परिषदेचे उद्घाटन आपल्या स्वरचित भजनाने केले. १९६२ ला चीनने भारतावर आक्रमण केले होते. यावेळी सगळ्या बाजूने भारतावर संकट कोसळले होते. भारताचे तत्कालीन रक्षामंत्री आणि पंतप्रधान यांनी महाराजांना बोलावून घेतले होते. महाराजांनी युद्धभूमीवर जाऊन आपल्या ओजस्वी भजनाने सैन्याचे मनोबल वाढवले. यावरूनच आपणास त्यांच्या भजनाची, भाषणाची ताकद लक्षात येते.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 2, September 2025
Impact Factor: 7.67

अशा प्रकारे राष्ट्रीय विकासाची भावना हृदयात धारण केलेल्या या महामानवाने अखेर शेवटचा श्वास ११ ऑक्टोंबर १९६८ रोजी घेतला. कर्क रोगामुळे त्यांचे निधन झाले. १२ ऑक्टोंबरला सर्व धर्माच्या धर्मगुरूंच्या उपस्थितीत तसेच लाखो भक्त, समाजसुधारक, राष्ट्रीय नेते इ. उपस्थित होते. १६० वर्षीय योगीराज सीतारामदास महाराज यांच्या हस्ते त्यांच्यावर अग्निसंस्कार करण्यात आला. त्यांचे शांतीस्थान पंचवटी (समाधी स्थळ) राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वर नागपूर, अमरावती मार्गावर साकारण्यात आले.

तुकडोजी महाराजांचा मृत्यू जरी झाला असला, तरी ते आजही सबंध देशातील मना मनात त्याच्या विचाराने, कार्याने, त्यांच्यावरील प्रेमाने जिवंत आहेत. तसेच गुरुकुंज आश्रम अमरावतीच्या रूपाने तर महाराज दीपस्तंभासारखे उभे आहेत.

**तुकडोजी महाराजांचे विचार–**

जन्माला येऊन स्वतःसाठीच जगण्यात काही अर्थ नसतो. आपण समाजाचे काही तरी देणे लागतो. हे लक्षात घेऊन आपापल्या पद्धतीने समाजासाठी कार्य करण्यात खरे जीवन आहे, असे लोकांना सांगणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज. रागाला शमविण्याचे प्रेम हेच एकमेव औषध, असे मत असणारे आणि तसे करणारे प्रेमयोगी तुकडोजी. सामान्यात राहून ज्यांचे असामान्यासारखे विचार होते. त्यांनी आपले विचार भजनातून लोकांपर्यंत पोहचवले. यांचे सर्वत्र आदराने व सन्मानाने नाव घेतले जाते. त्यांच्या विचारांची व कार्याची ओळख देशातच नव्हे, तर सबंध जगात आहे**.** त्यांचे विचार प्रत्यक्ष जीवनात उतरवणे, आचरणात आणणे ही काळाची गरज आहे. ते म्हणतात, "माणसाने आयुष्यात असे काम करावे, की मृत्यूनंतरही त्याची कीर्ती दरवळत रहावी. जो स्वतःच्या हिमतीवर कार्य सुरू करतो तो कधीच अडून राहत नाही. त्यासाठी योग्य मार्गावर चालताना संगत चांगली असावी**.** जे प्राप्त झाले त्यात आनंद मानावा आणि देण्यात समाधान**",** असे त्यांचे विचार नवा सशक्तपूर्वक असा समाज निर्माण करणारे आहेत**.** राष्ट्राच्या उन्नतीसाठी, विकासासाठी ग्रामीण भागातील दारिद्र्य, अज्ञान, सामाजिक विषमता नष्ट झाल्याशिवाय देश बलवान होणार नाही, असे

विचार त्यांनी आपल्या भजनातून जनतेपर्यंत पोहोचवले. त्याच्या या विचारांना प्रभावित होऊन अमेरिकेचे मार्डेकाय जॉन्सन म्हणतात, “संत तुकडोजी महाराजांच्या भजनातील जिव्हाळा थेट मनाला स्पर्श करतो आणि संगीताची स्फूर्तीमय संगती अंतकरणातून आनंदाच्या लहरी सहजगत्या उसळविते. हे भजनाचे खरोखरच महान वैशिष्ट्य आहे.”

भारत हा खेड्यांचा देश आहे. कृषिप्रधान देश आहे. हे लक्षात घेऊन प्रथम ग्रामीण विकास तुकडोजींनी हाती घेतला. ग्रामसुधारणा म्हणजेच देशसुधारणा, असे त्यांचे मत होते. जागतिकीकरण, औद्योगीकरण, उदारीकरण यामुळे एकीकडे देशाची प्रगती होत आहे, परंतु दुसरीकडे अधोगती सुद्धा पाहायला मिळते. आज माणसाची जागा यंत्राने घेतली आणि कृषिप्रधान देशात बळीराजाच उपाशी झोपत आहे. शेतकऱ्यांची अवस्था पाहून तुकडोजी दुःखी झाल्याचे लक्षात येते. शेतकऱ्याने पारंपारिक आणि आधुनिक शेती अशा दोन्ही पद्धतीने शेती करावी,असे ते सांगत. शेतात गाईचे शेण, मलमूत्र इ. वापर करून शेत कष्टाने कसून उत्पन्न वाढवावे. असा शेतकऱ्यांना ते संदेश देत. विश्वास, शांतता, समृद्धी, जर नांदवायची असेल, तर प्रथम ग्रामविकास अत्यावश्यक आहे. या विचाराने त्यांनी ग्रामगीता लिहली. ग्रामविकास झाल्यास देशाचा विकास होतो. त्यासाठी ग्राम कसे असावे? याचे प्रतिबिंब ग्रामगीतेतून पाहायला मिळते. ग्रामगीता जो शेतकरी वाचेल तो आत्महत्या करणार नाही. असा तुकडोजींना विश्वास होता. ग्रामगीतेच्या आधारे समाज घडवण्यात काल आणि आज फार मोठी मदत झाल्याचे लक्षात येते.

त्याचबरोबर कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्थाच काय तर राष्ट्रव्यवस्था ही स्त्रीवर कशी अवलंबून असते? हे त्यांनी लोकांना आपल्या विचारातून, भजनातून समजावून सांगितले. स्त्री-पुरुष असमानता, पुरुषसत्ताक पद्धती, बालविवाह, हुंडा पद्धती इ. त्यांनी आपल्या भजनातून कडाडून विरोध केला. स्त्री-पुरुष संबंधित विचार व्यक्त करताना ते म्हणतात, “समाजात पुरुषांना जसे अधिकार आहेत तसे अधिकार स्त्रियांना देखील मिळायला हवे. किंबहुना त्यांचा अधिक विचार व्हायला हवा. सर्व प्रकारच्या सुख सोयी पुरुषांना दिल्या जातात मात्र स्त्रियांना संस्कृतीच्या, रूढी, प्रथा, परंपरांच्या नावाखाली अडकून त्यांच्या वाट्याला फक्त

व्यथा दिल्या जातात. हे कोणते शास्त्र आहे? असे ते विचारतात. अमेरिकेच्या मिस फ्रान्सिस कझार्ड म्हणतात, "भाषा येत नसतानाही आपल्या प्रेमळ स्वभावाने खंजिरीच्या नादाने सर्वांना वेड लावले. माझ्या हृदयाला डोळे दिले." इतकी शक्ती त्यांच्या भजनांमध्ये, त्यांच्या विचारांमध्ये असल्याचे आपल्याला या वक्तव्यावरून समजते.

देशातील तरुण पिढी ही देशाचे भविष्य, आधारस्तंभ आहे. हे लक्षात घेऊन त्यांनी आपल्या भजनातून, कीर्तनातून व्यसनाधीनतेचा तीव्र विरोध केला. कारण तरुण पिठीच जर व्यसनाधीन असेल, तर निश्चितच देशाचे भविष्य धोक्यात येईल. देशाचे समाजाचे रक्षण करणे हे तरुण पिढीचे कर्तव्य आहे. त्यासाठी त्यांनी धैर्यवान व साहसी बनले पाहिजे. व्यसनापासून दूर राहायला हवे. नेहमी प्रामाणिक असावे. इतरांची फसवणूक करून पुढे जाण्यात अर्थ नसतो. एखादे ध्येय डोळ्यासमोर ठेवून मेहनतीने, जिद्दीने आपल्या ध्येयाप्रत झोकून द्यावे. तरच आणि तेव्हाच यश प्राप्ती होते. त्यासाठी देशाची तरुण पिढी सुसंस्कृत कशी होईल या संबंधित त्यांनी आपल्या लिखाणातून मार्गदर्शन केल्याचे अभ्यासातून दिसून आले. यातून आपणास तुकडोजी महाराजांची देशाविषयीची दूरदृष्टी लक्षात येतो.

तुकडोजी महाराज सांगतात, "माणसात भक्ती असावी,पण अंधश्रद्धेने नव्हे. ईश्वराचा उल्लेख ते सकारात्मक शक्तीसाठी करतात. ईश्वरोपासनेपेक्षा निसर्गोपासना आणि मूल्योपासना अशा गोष्टींवर त्यांचा भर जास्त होता. कुठल्याच प्रकारची जात, वर्ण, पंथ, धर्म, धर्मातील अनावश्यक कर्मकांड, अस्पृश्यता, असमानता न मानता मानवाने केवळ मानव म्हणून एकमेकांकडे पाहावे", असे ते म्हणत. ज्या मंदिरात हरिजनांना प्रवेश नसेल त्या मंदिरात सामुदायिक प्रार्थना होता कामा नये, असे ठणकावून सांगायला महाराज विसरले नव्हते. ते म्हणतात, "सर्व आपण बंधूच आहोत. अस्पृश्यतेला स्थान देऊ नका. स्व इच्छेनुसार काम करा आणि सर्व उद्योग आपलेच आहेत. या उद्योगांनाही जातीमध्ये विभागू नका", असे तुकडोजी महाराज समाजाला कळवळीने सांगताना दिसतात.विदर्भात जन्म घेतलेल्या तुकडोजींनी देशभर वैचारिक क्रांती घडवण्याचे कार्य केले. अंधश्रद्धा निर्मूलन व जातीभेदाच्या निर्मूलनविषयी विचार व्यक्त करताना महाराज

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 5, Issue 2, September 2025 Impact Factor: 7.67

म्हणतात, "अंधश्रद्धा दूर करणे ही काळाची गरज आहे. लोक शिक्षित होत आहेत, परंतु त्यांच्यात आजही अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात दिसते". तुकडोजी महाराजांनी आयुष्यभर बुवाबाजी व चमत्कारांचा विरोध करून वैज्ञानिक दृष्टिकोन तपासण्यास सांगितला. वैज्ञानिक धडे घेण्याचा सल्ला दिला. यासाठी ते भजन आणि कीर्तनाचा चांगला प्रभावी वापर करत असत. खंजिरी भजन हे त्यांच्या प्रबोधनाचे वैशिष्ट्य होते. जपान सारख्या देशात १९५५ मध्ये भरलेल्या जागतिक शांतता परिषदेत उपस्थित राहून त्यांनी विश्वबंधुत्वाचा सल्ला दिला. जपान प्रवासावर 'मरियम जपान' नावाचे पुस्तकही त्यांनी लिहिले. सर्वांना एकत्र आणणे हाच तुकाडोजींचा प्रयत्न त्यांच्या या बंधुत्वाच्या विचारातून स्पष्ट होतो. समाजात जर सुख, शांती, समाधान निर्माण करावयाचे असेल तर प्रथम स्वार्थी विचारांना दूर सारणे महत्त्वाचे आहे. स्वतःपुरता विचार न करता संपूर्ण समाजाच्या भल्याचा विचार करणे व तसे कार्य करणे महत्त्वाचे आहे. कारण एका घटकाचा विकास हा संपूर्ण विकास ठरू शकत नाही. अशी सडेतोड भूमिका त्यांनी मांडली. ज्यातून त्यांची सामूहिक वृत्ती दिसून येते. तसेच मानवता हाच खरा धर्म, असे ते म्हणत. तुकडोजींनी धर्माला आचरणाचे बाब मानले आहे. आपल्या अभंगातून ईश्वराविषयी व्यक्त करताना ते सांगतात, की देवाचे अस्तित्व सर्वत्र आहे. देवाला समाजाने आपापल्या सोयीनुसार विभागले आहे. त्याला धर्मानुसार निरनिराळी नावे देण्यात आलेली आहेत. असे जरी समाजात होत असले, तरी संपूर्ण विश्वात एकच देव आहे. एकच पवित्र अशी शक्ती आहे. देवाविषयी ही विश्वव्यापी कल्पना महाराजांनी जगापुढे मांडली. मूर्तीला धरून बसण्यात काही अर्थ नाही. निर्जीव मूर्तीवर तुम्ही कितीही पाणी, दूध इतर खाद्यान्न चढवले तरी खरी देवपूजा, खरी उपासना ही अशी असायला हवी ज्याद्वारे व्यक्तिमध्ये कर्तव्य गुणांची वाढ होईल, असे ते आपल्या विचारातून व्यक्त होतात. जे अगदी अचूक आहे. त्यांचा मानव धर्म हा पोथी पुराणात नाही, तर मनुष्याच्या चांगल्या विचारात त्याच्या चांगल्या आचरणात दिसतो. रंजलेल्या, गांजलेल्या, गरीब, अनाथ अशा जिवंत व्यक्तिंची सेवा करणे, त्यांना मदत करणे म्हणजे खरा मानव धर्म होय. थोडक्यात जनसेवा म्हणजेच ईश्वर सेवा, असे ते मानतात.

शिक्षण विषयक विचार व्यक्त करताना ते म्हणतात, "शिक्षणात शास्त्रोक्त आणि व्यावहारिक ज्ञान असायला हवे. अशा शिक्षणात जीवनाच्या संपूर्ण गरजा भागवण्याचे सामर्थ्य असते. शिक्षणामुळे व्यक्तीला योग्य दिशा मिळते". स्त्री शिक्षणाविषयी देखील महाराज बोलतात. शिक्षणाचा अधिकार महिलांना सुद्धा असायला हवा, असे ते म्हणतात. शिक्षणापासून स्त्रियांना वंचित ठेवणे हे तुकडोजी महाराजांना मान्य नव्हते. शिक्षणाचे महत्त्व सांगताना तुकडोजी शिक्षण घेतलेल्या लोकांना एक महत्त्वाची बाबा सांगायला विसरले नाहीत. जी फार महत्वाची आहे. ते म्हणतात, "शिक्षणाने ज्ञानी झालेल्या व्यक्तीकडे नेहमी नम्रता असायला हवी अन्यथा ते ज्ञान निरर्थक ठरते".

अशा अनेक महत्त्वाच्या बाबीसमवेत सामूहिक विवाह पद्धतीवर त्यांनी जोर दिला आहे. मुहूर्ताला महत्व न देता ज्यावेळी योग्य वेळ, काळ आणि ऋतू असेल तीच खरी लग्नाची योग्य आणि चांगली वेळ, असे ते मानत. त्यांच्या या विचारावरून अनावश्यक खर्च कमी करण्यावर तुकडोजी महाराज भर देतात, असे लक्षात येते. त्याच पैशाचा उपयोग चांगल्या कामासाठी करावा. इतरांना मदत, सहकार्य करण्याचे कार्य करावे. कारण देव आपल्याला देतो ते इतरांना देण्यासाठीच. सत्ता, संपत्ती असलेल्या व्यक्तीने कधी त्याचा गर्व करू नये. कारण ही सत्ता फार काळ टिकत नसते, मात्र सेवा ही नेहमीच स्मरनात राहते. म्हणून तुकडोजी महाराज देण्यात, इतरांची सेवा करण्यात विश्र्वास ठेवतात.

तुकडोजींच्या अशा संस्कारांना, जीवन मूल्यांना, त्यांच्या अमुल्य अशा विचारांना जिवंत ठेवण्यासाठी नागपूर विद्यापीठाला "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ", असे नाव देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे.

**विचारांची सद्यस्थितीतील प्रासंगिकता -**

तुकाडोजींचे विचार म्हणजे उत्तम आयुष्य जगण्याची प्रेरणा होय. हे वरील अभ्यासातून लक्षात आले. आता ही प्रेरणा म्हणजे सर्वांगीण बदल घडवून आणणारे त्यांचे हे अमूल्य विचार आज प्रत्येक व्यक्तीने

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 2, September 2025
Impact Factor: 7.67

आचरणात आणणे किती आवश्यक आहे. म्हणजे त्याच्या विचारांची प्रासंगिकता काय आहे? याचा पुढील प्रमाणे थोडक्यात अभ्यास करण्यात आलेला आहे.

आज समाजामध्ये नात्यातील प्रेम, भावना, आपुलकी, प्रामाणिकपणा तसेच समाजाविषयी आस्था कमी होऊन स्वार्थीपणा वाढत आहे. लोक स्वार्थापोटी घरातील व्यक्तीचा जीव घेण्यासही मागे पुढे पाहत नसल्याचे चित्र आपणास नेहमीच दिसून येते. मिळेल त्यात आनंद, समाधान न मानता जे नाही त्यात रडत बसण्याची वृत्ती वाढत आहे. कष्ट करून हिमतीने, समाधानी आयुष्य जगण्यास तुकडोजी महाराजांनी शिकवले. एकमेकांची काळजी घेत, मदतीची, सहकार्याची भावना जपत निस्वार्थपणे नाते सांभाळले पाहिजे,असे ते म्हणत. परंतु आजचा हा समाज सोशल मीडियाच्या विळख्यात इतका अडकला आहे, की जवळ असलेला माणूस ही त्याला दिसेनासा झाला आहे. सर्व नाती तो प्रत्यक्षात न जपता सोशल मीडियाच्या माध्यमातूनच दुरूनच जपत आहे. यातून नात्यातील प्रेम, भावना, जवळीकता नष्ट होत आहे. नात्यातील जिव्हाळा टिकवला पाहिजे. स्वार्थीपणा सोडून प्रत्येकाने आपापल्या पद्धतीने समाजासाठी कार्य करावे. अशी महाराजांनी शिकवण दिली. जी आजच्या या परिस्थितीत प्रत्येक व्यक्तीने आमलात आणणे गरजेचे बनले आहे.

पूर्वीपासून पुरुषसत्ताक पद्धतीने महिलांवर संस्कृतीच्या नावाखाली अनेक जाचक बंधने लादली. ज्यात स्त्री-पुरुष असमानता, बालविवाह, शिक्षणापासून वंचितता, विधवा पुनर्विवाह बंदी, अशा बऱ्याच बाबींमुळे स्त्रियांचे आयुष्य अंधारमय झाले. यातील काही समस्या कमी जरी झाल्या असल्या, तरी आजच्या काळात स्त्रियांना काही नवीनच समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. स्त्रियांना यातून पूर्णपणे मुक्त करावयाचे असेल, तर तुकडोजींचे स्त्रियांविषयीचे विचार आमलात आणणे गरजेचे आहे. त्यांनी स्त्रियांचा आदर करायला सांगितला. स्त्री-पुरुषांना समान हक्क मिळायला हवे, असे त्यांनी विचार मांडले. कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था स्त्रियांवरच अवलंबून असते. त्यामुळे स्त्रियांचा विकास म्हणजे देश विकास हे लक्षात घेऊन तसे परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे. त्याचबरोबर देशाचे रक्षण करणे हे तरुण पिढीचे कर्तव्य आहे, असे

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 5, Issue 2, September 2025 Impact Factor: 7.67

तुकडोजी महाराजांनी सांगितले. तरुण पिढी ही देशाचे भविष्य असते परंतु हीच तरुण पिढी व्यसनाधीनतेमध्ये आपले आयुष्य घालवत असेल, तर ते स्वतःचे आयुष्य आणि देशाचे भविष्य धोक्यात घालवत आहेत. तुकडोजींनी सांगितलेले तरुण पिढीचे कर्तव्य, देशप्रेम, धैर्यपणा, साहसीवृत्ती खऱ्या जीवनात आमलात आणणे गरजेचे आहे. सोबतच त्यांच्या देशाविषयीच्या दूरदृष्टीची, देशप्रेमाची, काळजीची जाणीव आणि कदर करावयास शिकणे अत्यावश्यक आहे. तेव्हा कुठे या तरुण पिढीमध्ये योग्य परिवर्तन होण्यास सुरवात होईल.

शिक्षणासंदर्भात देखील काही अशीच परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसते. नवनवीन शोध तंत्रज्ञान विकसित झाल्याने शिक्षण क्षेत्रात अनेक सकारात्मक परिवर्तन जरी झाले असले, तरी यातून अनेक समस्या देखील निर्माण झाल्या आहेत. तुकडोजींच्या मते शिक्षण असे असावे, की ज्यातून व्यक्तिला योग्य-अयोग्य, चूक-बरोबर याची पारख व्यवस्थित करता यावी. आपल्या वर्तनात चांगला बदल करता यावा. ज्या शिक्षणामुळे व्यक्ती ज्ञानी, बुद्धिमान होईल, असे शिक्षण असायला हवे. परंतु आज याउलटच चित्र पाहायला मिळते. कारण काही अपवाद वगळता व्यक्ती जसा शिक्षण जास्त घेत आहे, तसा तो स्वार्थी, कपटी, भ्रष्टाचारी होत आहे. व्यक्तींमधील माणुसकीच हरवत आहे. याचे कारण असे आहे, की आजच्या शिक्षणात व्यवहारिक ज्ञानच नाही. शिक्षणाच्या नावाखाली मिळवलेल्या फक्त उच्च लेबलच्या पदव्या आहेत. अशा पदव्यांचा वापर करून वशिल्या मार्फत मिळवलेले पद आहेत. ज्यात उच्च दर्जा दिसतो. भूमिका मात्र शून्य असते. मग प्रश्न उभा राहतो यालाच शिक्षण म्हणतात का? ज्यात ज्ञानाच्या 'ज्ञ' चा सुद्धा गंध नाही. नम्रता नाही, असे ज्ञान निरर्थक ठरते. जे फक्त कागदावर दिसते मात्र वर्तणुकीत, कार्यात किंवा व्यक्तिमत्त्वातून कधीच दिसू शकत नाही. एकविसाव्या शतकातील ही शिक्षण व्यवस्थेतील अतिशय गंभीर व चिंताजनक समस्या निर्माण झाली आहे. या परिस्थितीला बदलणे, शिक्षणामध्ये जे सामर्थ्य आहे ते व्यक्तीमध्ये उतरणे तसेच अशा परिस्थितीत तुकडोजींच्या शिक्षणासंदर्भातील विचारांना आचरणात आणणे काळाची गरज आहे.


DOI: 10.48175/IJARSCT-29035

तसेच मानवाने मानव म्हणून जगावे असा संदेश त्यांनी लोकांना दिला. ज्याची आज समाजाला नितांत गरज आहे. कारण आपण पाहतो आज मानव जाती धर्मात विभागला आहे. जाती धर्मासाठी, स्वार्थासाठी एकमेकांच्या जीवावर उठत आहे. कुठे तुकडोजींचे विचार आणि कुठे हा अमानवीय समाज. मृतपाय झालेल्या या समाजात माणुसकी निर्माण होणे आवश्यक आहे. अन्यथा मानवात राहून मानव शोधणे अवघड जाईल.

अशाप्रकारे आजच्या परिस्थितीच्या वास्तवाचा अभ्यास करता असे लक्षात आले, की तुकडोजींचे विचार व कार्य किती मूल्यवान आहेत. देशातील प्रत्येक नागरिकाने ते आचरणात आणणे, त्यांच्या कार्याची प्रेरणा घेणे सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे. यावरूनच तुकडोजींच्या विचारांची प्रासंगिकता लक्षात येते.

**निष्कर्ष आणि शिफारशी –**

ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा तुकडोजींच्या विचारसरणीचा केंद्रबिंदू, असे अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. आधुनिक कालखंडात तत्कालीन मृतपाय समाजात नवचैतन्य निर्माण करण्यासाठी, सामाजिक परिवर्तन घडवण्यासाठी ते अहोरात्र झटल्याचे दिसते. त्यांनी समाजात वैचारिक क्रांती घडवून आणण्याचे जे कार्य केले त्यासाठी अनेक राष्ट्रनेत्यांनी त्यांना क्रांतिकारी संत, असे संबोधले.

प्रेम, सदाचार, बंधुत्व, नितीमत्ता, नैतिक अधिष्ठान यावर आधारित सुजलाम सुफलाम समाज उभा करावयाचा असेल, तर तुकडोजींचे विचार आचरणात आणणे अत्यावश्यक आहे. त्यांना फक्त पुस्तकापर्यंत, अभ्यासापर्यंत मर्यादित न ठेवता त्यांना प्रत्यक्षात आचरणात आणणे, जीवनात उतरवणे काळाची गरज आहे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 2, September 2025
Impact Factor: 7.67

**समारोप –**

एकंदरीत वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी संपूर्ण जीवनच देशासाठी अर्पण केल्याचे सदरील अभ्यासावरून लक्षात आले. त्यांनी आपल्या भजनातून, कीर्तनातून लोकांना मानवतेचा, विश्वबंधुत्वाचा धडा दिल्याचे समजले. अगदी अचूक मार्गाने, आपल्या प्रेमळ, शांत स्वभावाने आणि गोड वाणीने जनतेला अस्पृश्यता, जातीभेद, स्त्री-पुरुष असमानता, बालविवाह हे प्रकार  देशासाठी किती घातक आहेत हे पटवून दिले. आपल्या विचारातून सामाजिक परिवर्तनाचे महान कार्य त्यांनी अहोरात्र केल्याचे दिसते. संपूर्ण मानव जातीला एक करणे हाच त्यांचा प्रयत्न त्यांच्या विचारांच्या विविध पैलू मधून समोर आला.

त्यांचे हे विचार आजच्या काळात प्रत्यक्ष आचरणात आणणे ही काळाची गरज आहे. विसाव्या शतकात त्यांनी मानवाला एकत्र आणण्यासाठी प्रयत्न केले. आज मात्र माणूस जाती-जातीत विभागला आहे. इतका विरोधाभास त्यांच्या विचारात आणि आजच्या लोकांच्या आचरणात दिसून येतो. जो फार चिंताजनक आहे. यासाठी सदरील संशोधनातून तुकडोजींचे विचार समाजापर्यंत पुन्हा नव्याने पोचवणे संशोधिकेला गरजेचे वाटले. यातून त्यांचे विचार, सांस्कृतिक मूल्य, शिकवण समाजात नव्याने रुजण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ –**

१. घोडे, राम. (२००९). संत तुकाराम- संत तुकडोजी तुलनात्मक दर्शन. द्वितीय आवृत्ती. सिताबडी, नागपूर: साहित्य प्रसारण केंद्र,.

२. आवारे, बाबा. (२०१४). भगवान तुकडोजी. द्वितीय आवृत्ती. सावदा, जळगाव: पद्मश्री प्रकाशन.

३. तुकडोजी महाराज. (२०१३). ग्रामगीता. २५ वी आवृत्ती. अमरावती: श्री गुरुदेव ग्रामगीता प्रतिष्ठान, गुरुकुंज आश्रम.

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in
DOI: 10.48175/IJARSCT-29035

IJARSCT
ISSN: 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Volume 5, Issue 2, September 2025
Impact Factor: 7.67

४. कडवे, रघुनाथ. (२००७). राष्ट्रसंत तुकडोजींची ग्रामविकास दृष्टी. पहिली आवृत्ती. नागपूर: अमोल प्रकाशन.

५. घोडे, राम. (१९८५). तरुणांचे तुकडोजी. नागपूर: राजीव प्रकाशन.

६. सावरकर, सुदाम. (१९९२). जीवनयोगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज- खंड ९. अमरावती: जनसाहित्य साधना.

७. https://www.tukdojimaharaj.com/Encyc/2022/5/2/About-Rashtrasant-Tukdoji-Maharaj.html

८. https://marathi.indiatimes.com/astro/dinvishesh/birth-anniversary-of-rashtrasant-tukdoji-maharaj/articleshow/75465276.cms

९. https://socialstudiesfoundation.org/2022/10/12/rashtrasant-tukadoji-maharaj/

१०. https://amravati.gov.in/mr/%E0%A4%A4%E0%A5%81%E0%A4%95%E0%A4%A1%E0%A5%8B%E0%A4%9C%E0%A5%80/